ऐक्य



डॉक्टर व नर्सिंग स्टाफला मार्गदर्शनप्रसंगी नेहा चिंचकर व संजना काटकर.

# सायबर शिक्षा फॉर सायबर सुरक्षाविषयी जनजागृती

**सातारा,** दि. २९ : वर्ये येथील रयत शिक्षण संस्थेचे कर्मवीर भाऊराव पाटील इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट स्टडीज अँड रिसर्च, सातारा आणि क्किक हिल फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमानाने सायबर शिक्षा फॉर सायबर सुरक्षा या प्रकल्पाअंतर्गत नेहा चिंचकर व संजना काटकर यांनी यशवंत हॉस्पिटल येथे जाऊन तेथील डॉक्टर व नर्सिंग स्टाफला सायबर गुन्हे कसे होतात, ते झाल्यास आपण काय केले पाहिजे, याबद्दल माहिती देऊन जनजागृती केली.

वेगवेगळ्या सायबर गुन्ह्यांची माहिती देऊन त्या गुन्ह्यांपासून कसे सुरक्षित राहिले पाहिजे याची माहिती देण्यासाठी सायबर शिक्षा फॉर सायबर सुरक्षा या प्रकल्पा अंतर्गत जनजागृती करत लोकांना मदत केली जात आहे.

फायनान्शिअल फ्रॉड, सोशल मीडिया फ्रॉड, या सगळ्या गोष्टी समजून सांगण्यात आल्या आणि यावर सायबर गुन्हा घडल्यावर आपण कुठे रिपोर्ट करावे याचीही माहिती तेथील डॉक्टर व स्टाफला दिली.

या उपक्रमासाठी संस्थेचे संचालक डॉ. बी. एस सावंत (डायरेक्टर) यांनी विशेष पुढाकार घेतला आणि महत्त्वपूर्ण सहकार्य दिले. त्यांच्याच मार्गदर्शनामुळे हा उपक्रम प्रभावीपणे राबवता आला. कॉम्प्युटर विभाग प्रमुख डॉ. आर. डी. कुंभार (एच ओ डी) आणि पी. ए. लोखंडे यांच्या सहकार्याने हा उपक्रम सुरू आहे. त्यांनी विद्यार्थ्यांना सायबर सुरक्षिततेवर मार्गदर्शन केले.

Main Edition
Aug 30, 2025 Page No. 2
Powered by: erelego.com